Item No. 10

Annexure - 'F'



Agenda Item No. 10 Note

## Brief summary of Common Admission Process of MBBS/ BDS conducted by State CET Cell for the year 2016

| अ. क्र. | दिनांक | नोटीस क्र. |
|---|---|---|
| १ | ०५/०८/२०१६ | भारतीय आयुर्विज्ञान परिषद, / भारतीय दंत परिषद नवी दिल्ली यांच्याकडील अधिसूचना ०५/०८/२०१६ नुसार प्रथम वर्ष MBBS व BDS अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेचा अंतिम दिनांक ३०/०९/२०१६ असा आहे. |
| २ | ०९/०८/२०१६ | केंद्रीय स्वास्थ व कुटुंब कल्याण मंत्रालय यांच्याकडील परिपत्रक दिनांक ०९/०८/२०१६ नुसार या प्रवेश प्रक्रियेत राज्यातील अभिमत विद्यापीठाचा देखील समावेश करावा व त्यासाठी एकत्रित समुपदेशन प्रक्रिया राबवावी असे कळविलेले आहे. |
| ३ | २०/०८/२०१६ | नोटीस क्र. १/३८९ दिनांक २०/०८/२०१६<br>सदर अधिसूचनेद्वारे खासगी विनाअनुदानित महाविद्यालयातील MBBS व BDS अभ्यासक्रमासाठी दिनांक २०/०८/२०१६ ते दिनांक २४/०८/२०१६ या कालावधीदरम्यान संभाव्य गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने महाराष्ट्रातील १० वी व १२ वी पास झालेल्या उमेदवारांकडून माहिती मागविण्यात आली. |
| ४ | २०/०८/२०१६ | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडील शासन क्र.सीईटी - ३५१६/प्र.क्र.३२५/१६/शिक्षण - २ दिनांक २०/०८/२०१६ नुसार राज्यातील सर्व अभिमत विद्यापीठातील वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमाचे सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिताचे प्रवेश एकत्रित समुपदेशनामार्फत करण्याबाबत निर्णय कळविण्यात आला. |

| | | |
|---|---|---|
| ५ | २१/०८/२०१६ | नोटीस क्र. १/३९० दिनांक २१/०८/२०१६<br>क्र. ४ च्या शासन निर्णयान्वये अभिमत विद्यापीठाच्या महाविद्यालयातील प्रथम वर्ष MBBS व BDS च्या अभ्यासक्रमासाठी दिनांक २१/०८/२०१६ ते दिनांक २४/०८/२०१६ या कालावधीदरम्यान ऑनलाईन पध्दतीने संभाव्य गुणवत्ता यादी तयार करण्यासाठी भारतातील नीट २०१६ पात्र उमेदवारांकडून माहिती मागविण्यात आली. |
| ६ | २२/०८/२०१६ | अभिमत विद्यापीठातील वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील अभ्यासक्रमाचे प्रवेश करण्यासाठी आवश्यक असणारी महाविद्यालय स्तरावरील माहिती राज्य सीईटी कक्षाच्या जा. क्र. ३९४ /२०१६ व ३९५/२०१६ अन्वये मागविण्यात आली. |
| ७ | २६/०८/२०१६ | रिट याचिका क्र. ९९९५/२०१६ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे अभिमत विद्यापीठाच्या दिनांक २७/०८/२०१६ रोजीमंजूर करावयाची संभाव्य गुणवत्ता यादी दिनांक ३०/०८/२०१६ पर्यंत पुढे ढकलण्यात आली. |
| ७ (ब) | २९/०८/२०१६ | अभिमत विद्यापीठातील प्रवेशाची संभाव्य गुणवत्ता यादी मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे दिनांक ३१/०८/२०१६ पर्यंत पुढे ढकलण्यात आली. |
| ८ | ३०/०८/२०१६ | सूचना क्रमांक २१/४११/२०१६ दिनांक ३०/०८/२०१६<br>न्यायालयीन याचिका ९९९५/२०१६ (डी. वाय.पाटील एज्युकेशन सोसायटी व इतर) विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर)<br>मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार अभिमत विद्यापीठाच्या महाविद्यालयातील प्रथम वर्ष प्रवेशास मा. उच्च न्यायालयाने स्थगिती दिली व त्यानुसार सक्षम प्राधिकारी यांनी सुरु केलेल्या अभिमत विद्यापीठाच्या प्रवेशाची प्रक्रिया थांबविण्यात आली. |

<table>
<tr>
<td>९</td>
<td>२८/०९/२०१६</td>
<td>वरील क्रमांक ८ मधील आदेशामध्ये शासनाकडून मा. उच्च न्यायालयाच्या Special Leave Petition दाखल करण्यात आली. त्यानुसार याचिका क्रमांक ९८३५/२०१६ व Special Leave Petition २६५५८/२०१६ (महाराष्ट्र शासन व इतर विरुध्द डी. वाय. पाटील एज्युकेशन सोसायटी व इतर) मध्ये दिनांक २८/०९/२०१६ रोजी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिलेली स्थगिती मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशनुसार रद्द करण्यात आले व महाराष्ट्रातील अभिमत विद्यापीठाच्या वैद्यकीय व दंत अभ्यासक्रम प्रवेशाची प्रक्रिया सक्षम प्राधिकारी यांच्याकडून राबविण्याबाबत कळविण्यात आले. या आदेशामध्ये या प्रवेश प्रक्रियेसाठी समिती गठीत करण्याबाबत न्यायालयाने कळविले त्यानुसार खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>सदस्यांची नावे</th><th>पद</th></tr>
<tr><td>१</td><td>आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई</td><td>अध्यक्ष</td></tr>
<tr><td>२</td><td>सर्व अभिमत विद्यापीठाच्या वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता / प्राचार्य / प्रतिनिधी</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>३</td><td>सर्व अभिमत विद्यापीठांच्या दंत महाविद्यालयाचे दंत महाविद्यालयाचे अधिष्ठाता / प्राचार्य / प्रतिनिधी</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>४</td><td>श्री. अरुणकुमार व्यास, विशेष कार्य अधिकारी, सीईटी कक्ष, मुंबई</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>५</td><td>अवर सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई</td><td>सदस्य सचिव</td></tr>
</table>
</td>
</tr>
<tr>
<td>१०</td>
<td>२८/०९/२०१६</td>
<td>नोटीस क्र. ३५/२०१६ दिनांक २८/०९/२०१६ नुसार अभिमत विद्यापीठाच्या प्रवेशाचे वेळापत्रक व इतर सूचना निर्गमित करण्यात</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | आल्या. |
| ११ | ०१/१०/२०१६ | नोटीस क्र. ४१/५०५/२०१६ दिनांक ०१/१०/२०१६<br>राज्य सीईटी कक्षाकडून निर्गमित करण्यात आलेली सूचना दिनांक २८/०९/२०१६ व मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशातील सूचना या विषयातील माहिती निर्गमित होऊन निर्णय घेण्यासाठी अभिमत विद्यापीठाच्या महाविद्यालयाच्या प्रवेशाची बैठक दिनांक ०१/१०/२०१६ रोजी आयोजित करण्यात आली. सदर बैठकीत न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन होण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यात आला व त्याप्रमाणे सुधारित सूचना क्रमांक ४१/५०५/२०१६ दिनांक ०१/१०/२०१६ निर्गमित करण्यात आली व त्या अनुषंगाने वेळापत्रक जाहीर करण्यात आले. सदर सुधारित सूचनेनुसार अभिमत विद्यापीठातील MBBS व BDS प्रवेशाचा अंतिम दिनांक ०७/१०/२०१६ असा होता. |
| १२ | ०४/१०/२०१६ | कार्यालयीन आदेश जा. क्र. ५१५/२०१६ दिनांक ०४/१०/२०१६<br>सुधारित वेळापत्रकानुसार अभिमत विद्यापीठाच्या महाविद्यालय स्तरावरील प्रवेश प्रक्रियेसाठी राज्य सीईटी कक्षाकडून निरीक्षकांची नेमणूक करण्यात आली व एकूण ८ ठिकाणी प्रत्येकी २ याप्रमाणे निरीक्षक पाठविण्यात आले व त्याची कार्यकक्षा निश्चित करण्यात आली. |
| १३ | ०५/१०/२०१६ | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्याकडील पत्र क्र. डब्ल्युपीएम १३१६/प्र.क्र.३४२/१६/शिक्षण-२ दिनांक ०५/१०/२०१६ नुसार वैद्यकीय व दंत पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशाच्या अंतिम दिनांक व इतर महाविद्यालयांप्रमाणे अभिमत महाविद्यालयांसाठी दिनांक ०७/१०/२०१६ आहे असे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अन्वयार्थ काढून विधी व न्याय विभागाचा |

| | | |
|---|---|---|
| | | अभिप्राय लक्षात घेऊन राज्य सीईटी कक्षास कळविण्यात आले. |
| १४ | ०६/१०/२०१६ | वरील क्रमांक १३ प्रमाणे सक्षम प्राधिकारी तथा आयुक्त यांनी अभिमत विद्यापीठासाठी देखील प्रवेशाचा अंतिम दिनांक ०७/१०/२०१६ आहे का? याबाबत शासनाचे मा. सर्वोच्च न्यायालयातील अभियोक्ता श्री. कटणेश्वरकर यांना अभिप्राय मागविले असता त्यांनी अभिमत विद्यापीठासाठीचा अंतिम दिनांक ०७/१०/२०१६ हा खासगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालयासाठी लागू नाही असे वैधानिक मत कळविलेले आहे. त्याप्रमाणे शासन विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालय प्रवेश प्रक्रिया दिनांक ३०/०९/२०१६ रोजी समाप्त करण्यात आली. |
| १५ | २७/०९/२०१६ | नोटीस क्र. ४५/५०९/२०१६ दिनांक ०३/१०/२०१६<br>मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका ७६/२०१५ मध्ये दिनांक २७/०९/२०१६ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार प्रथम वर्ष दंत अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचा अंतिम दिनांक ०७/१०/२०१६ पर्यंत करण्यास मुदतवाढ देण्यात आली. त्यानुसार सक्षम प्राधिकारी तथा आयुक्त यांनी दिनांक ३०/०९/२०१६ अखेर रिक्त राहिलेल्या दंत अभ्यासक्रमाच्या जागा भरण्यासाठी सर्व खासगी विनाअनुदानित दंत महाविद्यालयांसाठी वेळापत्रक निश्चित करुन दिले व त्यानुसार दंत अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया दिनांक ०७/१०/२०१६ रोजी समाप्त करण्यात आली. |
| १६ | २६/०९/२०१६ | नोटीस क्र. ३३/४७६/२०१६ दिनांक २६/०९/२०१६<br>मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली रिट याचिका क्र. ६५२/२०१६ दिनांक २३/०९/२०१६ (श्री. सुभाषकुमार विरुध्द युनियन ऑफ इंडिया व इतर) नुसार प्राप्त झालेल्या आदेशान्वये प्रथम वर्ष MBBS व BDS अभ्यासक्रमाच्या १५ टक्के पेकी प्रवेश हे नीट २०१६ च्या |

| | | |
|---|---|---|
| | | आधारावर करता येतील असे कळविण्यात आले व त्यासाठी तपशिलवार वेळापत्रक जाहीर करण्यात आले. |
| १७ | २९/०९/२०१६ | नोटीस क्र. ३७/४९३/२०१६<br>नव्याने मान्यता मिळालेल्या अनुक्रमे<br>१) MIMER Medical College तळेगाव दाभाडे, पुणे (१२७ जागा)<br>२) ACPM Medical College, धुळे (८५ जागा)<br>याचे प्रवेश दिनांक २९/०९/२०१६ रोजी राज्य सीईटी कक्षाकडून करण्यात येत असल्यासंबंधी जाहीर करण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी सूचना निर्गमित करण्यात आली. या दोनही ठिकाणी रिक्त राहणाऱ्या जागांवरील प्रवेश प्रक्रियेंवर देखरेख ठेवण्यासाठी राज्य सीईटी कक्षाकडून निरीक्षकाची नियुक्ती करण्यात आली. |
| १८ | ०३/१०/२०१६ | सूचना क्र. ४६/५१०/२०१६ दिनांक ०३/१०/२०१६<br>शासकीय / महानगरपालिकेच्या दंत महाविद्यालयातील प्रवेशाची ६ वी फेरी दिनांक ०४/१०/२०१६ रोजी घेण्याचे जाहीर करण्यात आले व सदर निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्याचा दिनांक ०६/१०/२०१६ असल्याबाबत कळविण्यात आले. |
| १९ | ०६/१०/२०१६ | नोटीस क्र. ५२/५२७/२०१६ दिनांक ०६/१०/२०१६<br>शासकीय / महानगरपालिका प्रथम वर्ष दंत अभ्यासक्रम महाविद्यालय स्तरीय प्रथम प्रवेशाची फेरी ही रद्द करण्यात आली असून सामाईकरित्या सर्व महाविद्यालयांसाठी एकत्रित प्रवेशाची फेरी ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई येथे दिनांक ०७/१०/२०१६ रोजी घेण्यात येत असल्याबाबत सूचना प्रसिध्द करण्यात आली. व तपशिलवार वेळापत्रक यथावकाश जाहीर करण्यात येईल असे कळविण्यात आले. |

| | | |
|---|---|---|
| २० | ०६/१०/२०१६ | रिट याचिका ७६/२०१६ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ०६/१०/२०१६ रोजी पारित केलेल्या आदेशाप्रमाणे राज्याकडे १५ टक्के प्रत्यार्पित झालेल्या MBBS व BDS अभ्यासक्रमाच्या जागांवरील प्रवेश हे नीट २०१६ मधील गुणवत्तेच्या आधारे ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई येथे वैयक्तिक समुपदेशनाद्वारे दिनांक ०७/१०/२०१६ रोजी घेण्यात येईल अशी सूचना निर्गमित करण्यात आली. |
| २१ | ०७/१०/२०१६ | मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे दिनांक ०७/१०/२०१६ रोजी ग्रँट वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई येथे झालेल्या १५ टक्के प्रत्यार्पित जागांवरील प्रवेश हे विद्यार्थ्यांकडे मूळ प्रमाणपत्र नसल्यास छायांकित प्रमाणपत्राच्या प्रतीवर प्रवेश देण्यात यावा या सूचनेप्रमाणे प्रथम वर्ष MBBS व BDS प्रवेशाची फेरी पूर्ण करण्यात आली. |

वरील प्रमाणे घटना क्रम मा. प्राधिकरणाच्या अवलोकनार्थ व मंजूरीसाठी सादर.